# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या तेविसाव्या सभेचे कार्यवृत्त

सभेचा दिनांक : २३ मार्च, १९८१.

सभेची वेळ : सकाळी १०.३० वाजता.

सभास्थान : समिती कक्ष, ६ वा मजला, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

सभेस उपस्थित असलेल्या सदस्यांच्या नावांची यादी सोबत जोडली आहे.

प्रारंभीच्या भाषणात अध्यक्षांनी प्राधिकरणाच्या या पूर्वीच्या (२२ व्या) सभेनंतर प्राधिकरणात दाखल झालेल्या सदस्यांचे स्वागत केले व तसेच त्या सभेनंतर प्राधिकरणाचे सदस्य नसलेल्या सदस्यांनी केलेल्या बहुमोल सेवेची आणि मार्गदर्शनाची नोंद घेतली. त्याचप्रमाणे प्राधिकरणाच्या काही महत्वाच्या धोरणाबाबत व विकास योजनाबाबत घडलेल्या महत्वपूर्ण घटनांचाही अध्यक्षांनी उल्लेख केला :-

१) कांदे आणि बटाटयांच्या व्यापाऱ्यांनी कांदे-बटाटयाच्या बाजार पेठेच्या स्थलान्तरास आव्हान देणारा अर्ज सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावल्यावर कांदे बटाटयाच्या बाजार पेठेचे स्थलांतर करणे.

२) वडाळा-आनिक येथील नियोजित ट्रक टर्मिनलचा तपशीलवार प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी राखून ठेवलेल्या जमिनीचे अनधिकृत अतिक्रमणापासून संरक्षण करण्यासाठी उपाय योजना करणे.

३) नियोजित पूर्व-पश्चिम लोहमार्गाच्या छन्नमार्गा विषयक प्रकल्पाकरिता (वांद्रे-कुर्ला-मानखुर्द-वाशी-बेलापूर-पनवेल)प्रकल्पाकरिता सामाजिक व खर्च-लाभ विषयक विश्लेषणाचा समावेश असलेल्या तपशीलवार अहवालांना व सिडको, बीएम्आर्डीए व राज्य शासन या प्रकल्पास त्वरित मंजुरी देऊन.त्याची कार्यवाही करण्याकरिता भारत शासनाला प्रवृत्त करण्यासाठी सर्वोच्च स्तरावर करीत असलेल्या प्रयत्नांना अंतिम स्वरुप देणे.

४) अंतर्देशीय जलवाहतुक प्रकल्पाचा तपशीलवार प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी एक समिती स्थापन करणे.

५) कल्याणपासून....२/-

५) कळव्यापासून तुर्भ्यापर्यन्त रेल्वेच्या नियोजित मालवाहू फाटयाचा तांत्रिक-आर्थिक अभ्यास व उरलेल्या शेत-मालाच्या घाऊक बाजारपेठा तुर्भ्याला स्थलांतरित करता याव्या म्हणून या प्रकल्पाची त्वरेने कार्यवाही व्हावी म्हणून करण्यांत येत असलेले प्रयत्न पूर्ण करणे.

६) भारत शासनाने न्हावा-शेवा येथे अग्रगण्य बंदर विकसित करावयाच्या कार्याचा प्रारंभ म्हणून न्हावा शेवा प्रारंभिक सुविधा अभ्यास गटाच्या अहवालास अंतिम स्वरुप देणे.

७) ठाणे जिल्हयातील ६ नगरपरिषदांच्या क्षेत्रांचा व १०४ खेडयांचा समावेश असलेल्या ८६ कोटी रु. खर्चाच्या जागतिक बँक सहाय्यित पाणी पुरवठा व मलोत्सर्ग प्रकल्पाचे उद्घाटन.

८) केवळ मुंबई महानगर प्रदेशाच्या गरजा भागविण्यासाठी मुंबई जलोगम क्षेत्रांतील ९ जलाशयांतील नद्यांचे पाणी राखून ठेवण्या-बाबत अलीकडेच महाराष्ट्र शासनाच्या पाटबंधारे खात्याने काढलेले आदेश.

तसेच, बृहन्मुंबईतील गलिच्छ वस्त्यांच्या व मुंबई बेटांतील मोडकळीस आलेल्या घरांच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी व हा प्रश्न सोडविण्याकरिता गरीव सूचना करण्यासाठी राज्य शासनाने एक उच्चाधिकार सुकाणू समिती नियुक्त केली असल्याचेही अध्यक्षांनी सांगितले.

मुंबईतील झोपडपट्टयांच्या व मोडकळीस आलेल्या घरांच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी राज्य शासनाने एक उच्चाधिकार सुकाणू समिती नियुक्त केल्या-बाबत अध्यक्षांनी केलेल्या विधानास अनुलक्षून अनेक सदस्यांनी असमाधान व चिंता व्यक्त केली या सदस्यांच्या मते हा निर्णय एकांगी असून त्या निर्णयाने प्राधिकरणास डावलण्यांत आले आहे. संपूर्ण मुंबई महानगर प्रदेशाचे नियोजन करणारी प्राधिकरण ही प्रमुख संघटना असून शिवाय चटई क्षेत्र निर्देशांक शिथिल करण्याची बाब धरुन वरील अभ्यास गटाकडे सोपविलेल्या सर्व बाबींशी प्राधिकरणाचा संबंध येतो. चटई क्षेत्र निर्देशांक शिथिल केल्यास नागरी सेवा, नागरी सुविधा व नागरी वाहतुक यंत्रणेवर असहय ताण पडून सारी व्यवस्थाच कोलमडून पडेल अशी भीति सदस्यांनी व्यक्त केली. प्राधिकरणाला डावलण्याचा किंवा बृहन्मुंबईतील चटई क्षेत्र निर्देशांकावरील विद्यमान निर्बंध सामान्यत: शिथिल करण्याचा शासनाचा कधीही हेतू नव्हता हो गोष्ट अध्यक्षांनी स्पष्ट केली. बृहन्मुंबईतील झोपड-पट्टयांचा व मुंबई बेटातील मोडकळीस आलेल्या घरांच्या प्रश्नाचा संपूर्ण अभ्यास

करणे हा उच्चाधिकार गट स्थापन करण्यामागील शासनाचा उद्देश होता. या प्रश्नाशी प्राधिकरणासह अनेक संस्थांचा संबंध असून त्या प्रश्नांचा अभ्यास करुन त्याचे जाणकार मंडळींकडून विश्लेषण करणे हा सदरहू अभ्यास गट नियुक्त करण्यामागील हेतू आहे. या बाबतीत आस्था असणाऱ्या व्यक्ती व संबंधीत सरकारी व बिन सरकारी संस्थाबरोबर चर्चा व सल्लामसलत करुन प्रश्न सोडविण्यासाठी उपयुक्त होतील असे प्रभावी व व्यवहार्य प्रस्ताव हा गट आखील अशी अपेक्षा आहे असेही अध्यक्षांनी सांगितले. प्रदीर्घ चर्चेनंतर असे ठरले की उच्चाधिकार समितीकडे सोपविलेल्या बाबींवर प्राधिकरणास आपल्या दृष्टिकोनास अंतिम स्वरुप देता येणे शक्य व्हावे म्हणून लवकरांत लवकर प्राधिकरणाची एक खास सभा घेण्यांत यावी असे केल्यास अभ्यास गटाने आपल्या प्रस्तावांस शिफारशींस अंतिम स्वरुप देण्यापूर्वी प्राधिकरणाचे अभिप्राय अभ्यास गटास कळविता येतील.

<u>बाबी क्र. १ व २ : यापूर्वीच्या (२२व्या) सभेच्या कार्यवृत्तास व त्यावर करण्यांत आलेल्या कार्यवाहीस पुष्टी देणे.</u>

चर्चेनंतर कार्यवृत्तास पुष्टी देण्यांत आली व केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यांत आली. चर्चेच्या ओघांत कांही सदस्यांनी कांही विचार व मुद्दे मांडले. ते खालीलप्रमाणे :

(१) मुंबईतील मच्छिमारांच्या समस्यांचा अभ्यास करण्यासाठी प्राधिकरणाने स्थापन केलेल्या अभ्यास गटाने केलेल्या कामाच्या प्रगतीची नोंद घेत असतांना असे निदर्शनास आणण्यांत आले की जाळी, मासळी इ. वाळविण्यासाठी मच्छिमारांना पुरेशी जागा मिळत नाही. या विषयाचा अभ्यास करण्यासाठी यापूर्वी नियुक्त केलेल्या खेर समितीच्या अहवालावर विचार करण्यांत यावा. मालवणी येथे मच्छिमार समाज मोठ्या संख्येने वास्तव्य करतो. त्यांच्या समस्यांनी अधिक गंभीर स्वरुप धारण करु नये म्हणून तेथील जमिनीच्या अनधिकृत पुन:प्रापणास आळा घालण्यांत यावा.

(२) दक्षिण मुंबईतून घाऊक बाजार पेठांच्या स्थलांतराच्या सर्वसाधारण प्रश्नाचा विचार करतांना घाऊक फूल

बाजारासाठी (शक्यतो दादर येथे) ठिकाण निश्चित करतांना या बाजारासाठी पुरेशी जागा उपलब्ध करण्याची गरज नजरेआड करतां कामा नये. कार्यवृत्ताच्या इंग्रजी प्रतीत, फूल बाजारासंबंधीच्या प्रस्तावाचा उल्लेख करण्यांत आला असून तो मराठी तर्जुम्यांत करावयाचा राहून गेला ही गोष्ट निदर्शनास आणण्यांत आली. नजर चुकीने झालेली ही चूक दुरुस्त करण्यांत यावी.

(३) वसईच्या ईशान्येस वाळीव-गोखिवरा नजीक महारोगी वस्ती करुन राहत असल्यामुळे सार्वजनिक आरोग्यास होणाऱ्या धोक्याबाबत आरोग्य सेवा संचालनालयाने केलेल्या मतप्रदर्शनाची नोंद घेत असतांना सदस्यांचे आरोग्य सेवा संचालनालयाच्या मतांनी समाधान झाले नाही. संचालनालयाच्या मते महारोग व जलसंचयाचा कांहीही संबंध नसल्यामुळे महारोग्यांमुळे सार्वजनिक आरोग्य धोक्यांत येते. या विधानास शास्त्रात आधार नाही या बाबीची फेर तपासणी करुन वाळीव-गोखिवरे गावानजीक महारोगी एकत्र वास्तव्य करुन राहत असल्यामुळे होणाऱ्या संभाव्य प्रदूषणाबाबत अधिकृत व विश्वसनीय शास्त्रीय मत विचारण्यांत यावे असे ठरले वाळीव गोखिवरे गावानजीक महारोगी वसहत करुन केंव्हा व केंव्हापासून राहत आहेत. याबाबतही माहिती मिळवावी असेही ठरले.

(४) व्यापारी कारणासाठी बृहन्मुंबईतील जागांचे अनधिकृत परिवर्तन करण्याबाबत सदस्यांना अशी माहिती देण्यांत आली की, बृहन्मुंबईतील जागांच्या वापरांत अनधिकृत बदल करण्यावर नियंत्रण घालण्याच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी शासनाच्या नगर विकास व आरोग्य विभागाच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी समितीने एक समिती स्थापन केली आहे. समितीची यापूर्वीच एक बैठक झाली असून तिने कांही हंगामी स्वरुपाच्या सूचना केल्या आहेत.

(५) कुर्ला येथील रेल्वे पुलाच्या व विशेषतः त्या पुलाकडे जाणाऱ्या संपर्क मार्गाच्या बांधकामास होणाऱ्या विलंबाबाबतसदस्यांनी चिंता व्यक्त केली. व हे काम त्वरित करण्यासाठी सर्व प्रकारची उपाय योजना करण्यांत यावी या गोष्टीवर भर देण्यांत आला.

(६) ....

(६) यापूर्वी ठरल्याप्रमाणे न्हावा-शेवा व ट्रक टर्मिनल प्रकल्पाला सदस्यांची संकल्पित भेट सर्वांना सोयिस्कर अशा वेळी त्वरित आयोजित करावी असे ठरले.

बाब क्र. ३ : सन १९७७ च्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (जमिनीची विल्हेवाट) विनियमांतील विनियम ७ व ९ मध्ये दुरुस्ती.

प्राधिकरणाने कार्यसूचीवरील विषयावर विचार विनिमय करुन खालील ठराव संमत केला.

ठराव क्र. १८१ :

असा ठराव करण्यांत येत आहे की स्थायी समितीने दिनांक ७.३.१९८१ चा आपला ठराव क्र.१५८ ने शिफारस केल्याप्रमाणे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम १९७७ मधील विनियम ७ व ९ च्या दुरुस्त्यांस याव्दारा मान्यता देण्यांत येत आहे.

पुढे असा ठराव करण्यांत येत आहे की वर दुरुस्त करण्यांत आलेला विनियम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ चे कलम ५० अन्वये प्राधिकरणाने केला असे समजण्यांत येईल.

बाब क्र. ४ : वांद्रे-कुर्ला संकुलाच्या 'ई' ब्लॉकमधील २ प्लॉटस्वर सुयोग्य इमारत/इमारती बांधण्यासाठी महाराष्ट्र शासनाची मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास विनंती.
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम १९७७ मधील विनियम ९ मध्ये दुरुस्ती.

प्राधिकरणाने कार्यसूचीवरील विषयावर विचार विनिमय करुन खालील ठराव संमत केला.

ठराव क्र. १८२ :

असा ठराव करण्यांत येत आहे की स्थायी समितीने आपला दिनांक ७.३.१९८१ चा ठराव क्र. १५७ अन्वये शिफारस केलेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियमांतील विनियम ९ च्या दुरुस्तीस याव्दारा मान्यता देण्यांत येत आहे.

पुढे असा ठराव करण्यांत येत आहे की वरील दुरुस्त विनियम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ चे कलम ५० ने प्राधिकरणाने केला असे समजण्यांत येईल.

पुढे असा......६/-

पुढे असा ठराव करण्यात येत आहे की, स्थायी समितीने प्राधिकरणाची मान्यता अपेक्षित धरून आपला दिनांक ७ मार्च १९८१ चा ठराव क्र. १५६ ने प्राधिकरणाच्या निधीतून शासकीय इमारतीचे बांधकाम करण्याच्या ज्या प्रस्तावाचा स्वीकार केला त्याला याव्दारा मान्यता देण्यांत येत आहे.

बाब क्र. ५ : वांद्रे-कुर्ला अधिसूचित क्षेत्राच्या अंतिम नियोजन प्रस्तावांत किरकोळ दुरुस्ती.

अल्पशा चर्चेनंतर असे ठरले की, या बाबीच्या अधिक तपशीलवार विचारार्थ मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मध्य रेल्वे, व मुंबई महानगरपालिका यांच्या प्रतिनिधींची बैठक घेण्यांत यावी. म्हणून या बाबींचा विचार-विनिमय लांबणीवर टाकण्यांत यावा.

बाब क्र. ६ : १९८१-८२ चा वार्षिक कार्यक्रम.

१९८१-८२ च्या वार्षिक कार्यक्रमावरील चर्चेच्या ओघांत, चर्चेत भाग घेणाऱ्या सदस्यांनी खालील मुद्दे मांडले :-

(१) १९८१-८२ च्या वार्षिक कार्यक्रमांत भिवंडी नगरपालिका परिषदेने भिवंडी येथे बांधावयाच्या भाजीपाला व सूत बाजाराच्या बांधकामासंबंधी एक बाब आहे. या बाजारांत कापडाच्या क्रय विक्रयाचीही सोय करून त्याची व्याप्ति वाढविता येईल की काय ते तपासून पाहण्यांत यावी.

(२) १९७३ मध्ये मंजूर झालेल्या मुंबई महानगर प्रदेशाच्या प्रादेशिक योजनेत, त्यानंतर झालेल्या घटना विचारांत घेऊन, सुधारणा करण्याच्या गरजेवर कांही सदस्यांनी भर दिला. व त्याबाबत काय कार्यवाही करण्यांत येत आहे याविषयी चौकशी केली असे स्पष्ट करण्यांत आले की, मुंबई महानगर प्रदेशाच्या प्रादेशिक योजनेत दर दहा वर्षांनी सुधारणा करणे ही प्राधिकरणाची कायदेशीर जबाबदारी असून १९८१-८२ च्या वार्षिक कार्यक्रमानुसार, १९८३ मध्ये प्रादेशिक

योजनेत व्हावयाच्या भागासंबंधी प्राथमिक काम सुरु करता यावे म्हणून १९८१-८२ च्या वार्षिक कार्यक्रमात त्यासाठी तरतूद करण्याची सूचना यापूर्वीच करण्यात आलेली आहे.

(३) नव्या मुंबईच्या ठाणे बेलापूर पट्ट्यातील हर्डिली व रॅलीस सारख्या कांही रासयनिक कारखान्यामुळे होत असलेल्या वायू-प्रदूषणाचा कांही सदस्यांनी उल्लेख केला. तेव्हा असे स्पष्ट करण्यात आले की वायुप्रदूषणाचा प्रतिबंध व नियंत्रण या विषयीचा केंद्र शासनाचा कायदा संमत होऊन अमलात आल्यावरच वायुप्रदूषण करणाऱ्या औद्योगिक कारखान्याविरुध्द परिणामकारक उपाय योजना करता येईल. असा कायदा करण्याची प्रक्रिया चालू आहे. त्यानंतर असेही स्पष्ट करण्यात आले की महाराष्ट्र जल प्रदूषण प्रतिबंध मंडळाच्या विद्यमाने १३ वायु गुणधर्म संनियंत्रण केंद्रे स्थापन करुन ( मुंबई महानगर पालिका व नव्या मुंबईचे क्षेत्र वगळून) मुंबई महानगर प्रदेशासाठी हवेच्या गुणधर्माची पाहणी करण्यासाठी १९८१-८२ च्या वार्षिक कार्यक्रमात तरतूद करण्यात आली आहे.

(४) ठाणे जिल्ह्यातील ६ नगरपालिका परिषदा व १०४ खेड्यांकरिता पाणी पुरवठा व मलोत्सर्ग प्रकल्पाचा व्यवहार्यता अहवाल तयार करण्याचे काम सोपविलेल्या मे. किर्लोस्कर कन्सल्टंट्स लि. या संस्थेने आपला अहवाल सादर केला की काय याबाबत कांही सदस्यांनी चौकशी केली. त्यावर असा खुलासा करण्यात आला की सदरहू सल्लागारांनी आपला अहवाल यापूर्वीच सादर केला असून मुंबई जलोगम क्षेत्रातील जलसंपत्तीचा अंदाज व विकास या पूरक स्वरुपाच्या कामाबद्दलही सल्लागारांनी आणखी एक अहवाल सादर केला आहे. हा अहवाल आता अद्यावत करण्यात येत असून मुंबई जलोगम क्षेत्रातील जलसंपत्ति विषयक माहिती सुधारुन अद्यावत करण्याकरिता अभ्यास हाती घेण्यासाठी १९८१-८२ च्या वार्षिक कार्यक्रमात यापूर्वीच तरतूद सुचविण्यात आली आहे.

(५) ठाणे जिल्ह्यातील विधान सभा सदस्य श्री. मोमीन यांनी भिवंडी शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या लाखिवली प्रकल्पाची कार्यवाही का करण्यात आली नाही याबाबत चौकशी केली. या संबंधात

पुढे चालू ..../-

असे स्पष्ट करण्यांत आले की जागतिक बँकेचे सहाय्य असलेला ८६ कोटी रु.खर्चाचा, ठाणे जिल्हयातील ६ नगरपालिका व १०४ खेडयांच्या पाणी पुरवठा व मलोत्सर्ग प्रकल्पांत भिवंडी नगरपालिका शहराचाही समावेश होतो आणि म्हणून भिवंडी शहराच्या मुख्यत: पाणी पुरवठा विषयक गरजा भागविण्यासाठी यापूर्वी आखण्यांत आलेला लाखिवली प्रकल्प अनावश्यक झाला व म्हणून त्याचा पाठपुरावा करण्यांत आला नाही.

६) मध्य वैतरणा प्रकल्पाची प्रगति जाणून घेण्याची इच्छा श्री.धारप यांनी व्यक्त केली. इतर कांही कामे व योजना याबाबतही श्री.धारप यांनी माहिती मागितली. श्री.धारप यांना हवी असलेली माहिती त्यांना स्वतंत्रपणे देण्यांत यावी असा निर्देश अध्यक्षांनी दिला.

त्यानंतर प्राधिकरणाने १९८१-८२ च्या वार्षिक कार्यक्रमास मान्यता दिली व खालील ठराव संमत केला :

ठराव क्र. १८३ :

असा ठराव करण्यांत येत आहे की (अ) (कार्यसूची टिप्पणी) टिप्पणी सोबत सादर करण्यांत आलेल्या १९८१-८२ च्या वार्षिक कार्यक्रमास याव्दारा मान्यता देण्यांत येत आहे आणि (ब) वार्षिक कार्यक्रमांत समाविष्ट केलेल्या योजनांच्या तपशिलास मान्यता देण्यास स्थायी समितीला याव्दारा अधिकार देण्यांत येत आहेत.

बाब क्र. ७ : दिनांक २७.७.१९८० रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या सभेस सादर केलेल्या व तिने मान्यता दिलेल्या १९८०-८१ च्या वार्षिक कार्यक्रमांत समाविष्ट असलेल्या चालू कार्यक्रमांचे व नियोजित कार्यक्रमांचे योजना निहाय विश्लेषण. (या पूर्वीच्या सभेत लांबणीवर टाकण्यांत आलेली बाब क्र.९)

प्राधिकरणाने कार्यसूचीवरील विषयावर विचार विनिमय केला व योजनांच्या प्रगतीची नोंद घेतली.

बाब क्र. ८ : १९८१-८२ चे वार्षिक अर्थसंकल्पीय अंदाज.

प्राधिकरणाने कार्यसूचीवरील विषयावर विचार विनमय केला व खालील ठराव संमत केला .

ठराव क्र.१८४.....९/-

ठराव क्र.१८४ :

असा ठराव करण्यात येत आहे की महानगर प्राधिकरणाच्या अंदाजित जमा व प्रतिपूर्ती दर्शविणारे वित्तीय वर्ष १९८१-८२ च्या वार्षिक अर्थसंकल्पीय अंदाजास व १९८०-८१ च्या सुधारित अंदाजास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ चे कलम ३३ (१) अन्वये याव्दारा मान्यता देण्यात येत आहे.

पुढे असा ठराव करण्यात येत आहे की कार्यक्रमात समाविष्ट न झालेल्या व प्रत्येकी अंदाजे १० लाख रु.हून अधिक खर्च नसलेल्या व ज्यांच्या संबंधात मान्यताप्राप्त अर्थसंकल्पात तरतूद केलेली नाही अशा योजना, सर्वेक्षणे इ.वर उक्त मर्यादेहून अधिक नाही इतका खर्च करण्यास मंजुरी देण्यास प्राधिकरण याव्दारा स्थायी समितीस अधिकार प्रदान करीत आहे मात्र अशा प्रकरणांचे प्रतिवेदन प्राधिकरणाच्या यापुढील सभेपुढे ठेले पाहिजे.

पुढे असा ठराव करण्यात येत आहे की अभ्यास, सर्वेक्षणे व अन्वेषणाचा समावेश असलेल्या व ज्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे. अशा योजनांच्या तपशिलास मंजुरी देण्यास संबंधित कार्यकारी मंडळांना याव्दारा अधिकार देण्यात येत आहे.

पुढे असा ठराव करण्यात येत आहे की पदे निर्माण करण्याची क्षमता असलेल्या प्राधिकरणांना (Authorities) अर्थसंकल्पाच्या आस्थापना अनुसूचीत समाविष्ट असलेली पदे निर्माण करण्याचा अधिकार याव्दारा देण्यात येत आहे. मात्र अशा पदांवरील खर्च हा अर्थसंकल्पात कर्मचारी वर्गाचे पगार व भत्ते यासाठी करण्यात आलेल्या एकूण तरतुदीतून भागविता येईल.

बाब क्र.९ : १९७९-८० चा प्राधिकरणाचा वार्षिक अहवाल

या विषयावरील चर्चेच्या ओघात खालील मुद्दे उपस्थित करण्यात आले.

(१) असे सांगण्यात आले की २.३५ लाख रु. खर्चाचे मुंबई महानगरपालिकेने पार पाडलेले अंबापाडा ग्रामसुधारणेचे काम समाधानकारक झालेले नाही. सदस्यास असे सांगण्यात आले की प्रत्यक्ष परिस्थिती विषयीची माहिती मुंबई महानगरपालिकेकडून

घेऊन ती यथावकाश प्रतिवेदित करण्यात येईल.

(२) मुंबई शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या जलवाहिन्या ज्या गावातून जातात त्या गावांना त्या जलवाहिन्यांचा लाभ मिळत नाही. महापालिका आयुक्तांनी असे सांगितले की मुंबई शहराला पाणी पुरवठा करणे ही महापालिकेची प्रमुख जबाबदारी आहे. तरीसुध्दा जलवाहिन्यांच्या मार्गावरील गावांना पाणी पुरवठा करतां येईल की काय ते मुंबई महानगर-पालिका तपासून पाहील.

प्राधिकरणाने त्यानंतर खालील ठराव संमत केला :

ठराव क्र. १८५ :

असा ठराव करण्यांत येत आहे की १९७९-८० च्या प्राधिकरणाच्या वार्षिक अहवालाच्या मुसद्यास मान्यता देण्यांत येत आहे व तो राज्य शासनास सादर करण्याचा महानगर आयुक्तांस अधिकार देण्यांत येत आहे.

बाब क्र. १० : स्थायी समितीची निवडणूक

या बाबीवरील विचार विनिमय लांबणीवर टाकण्यांत आला.

बाब क्र. ११ : कल्याण समूह अधिसूचित क्षेत्राकरिता विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा वार्षिक अहवाल १९७८-१९८०.

प्राधिकरणाने कार्यसूचीवरील बाबीचा विचार विनिमय करुन खालील ठराव संमत केला.

ठराव क्र. १८६ :

असा ठराव करण्यांत येत आहे की कल्याण समूह अधिसूचित क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १९७८-८० या कालावधीतील वार्षिक अहवालाच्या मुसद्यास याव्दारा मान्यता देण्यांत येत असून ते राज्य शासनास सादर करण्याचा अधिकार महानगर आयुक्तांस देण्यांत येत आहे.

बाब क्र. १२ : वांद्रे-कुर्ला अधिसूचित क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने प्राधिकरणाचा १९७९-८० या वर्षाचा वार्षिक अहवाल.

या बाबीवर विचार विनिमय करुन प्राधिकरणाने खालील ठराव संमत केला.

ठराव क्र.१८७ :.....११/

ठराव क्र. १८७ :

अस ठराव करण्यात येत आहे की वांद्रे-कुर्ला अधिसूचित क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने प्राधिकरणाच्या १९७९-८० च्या वार्षिक अहवालाच्या मुद्द्यास याव्दारा मान्यता देण्यात येत असून तो राज्य शासनास सादर करण्याचा अधिकार महानगर आयुक्तांस देण्यात येत आहे.

बाब क्र. १३ : कळवा-तुर्भे मालवाहू फाटयाचे बांधकाम.

या बाबीवर विचार विनिमय करुन प्राधिकरणाने खालील ठराव संमत केला.

ठराव क्र.१८८ :

असा ठराव करण्यात येत आहे की, नव्या मुंबईत तुर्भे येथे विकसित करावयाच्या कृषि उत्पन्न घाऊक बाजारांना आवश्यक असलेल्या कळवा-तुर्भे मालवाहू फाटयाचे बांधकाम करण्यासाठी १९८१-८२ ते १९८३-८४ या तीन वर्षाच्या कालावधीत जिल्हा नियोजन व विकास मंडळांना पुरवावयाच्या निधीतून सिडकोला सहायक अनुदान म्हणून रु. २ कोटीचा भरणा करण्यास प्राधिकरण याव्दारा मान्यता देत आहे.

पुढे असा ठराव करण्यात येत आहे की, कळवा-तुर्भे लोहमार्ग फाटयाच्या बांधकामासाठी वरील १९८१-८२ ते १९८३-८४) कालावधीमध्ये उचित हप्त्यात, २ कोटी रुपयांची रक्कम 'पूरक कर्ज' म्हणून सिडकोला द्यावी व पूर्वीच्या प्रथा व इतर संबंधित बाबी विचारात घेऊन या कर्जावर द्यावयाच्या व्याजाचा दर ठरविण्याचा अधिकार याव्दारा स्थायी समितीस देण्यात येत आहे.

पुढे असा ठराव करण्यात येत आहे की प्राधिकरणाची मान्यता अपेक्षित धरुन प्राधिकरणाच्या अध्यक्षांनी वरील प्रस्तावासंबंधात केलेल्या कार्यवाहीस याव्दारा अनुसमर्थन देण्यात येत आहे व कळवा-तुर्भे मालवाहू फाटयाबाबत त्वरीत कार्यवाही व्हावी म्हणून आवश्यक त्या सर्व कृती करण्यास महानगर आयुक्तांना याव्दारा अधिकार देण्यात येत आहे.

बाब क्र.१४....१२/

बाब क्र. १४ : रेल इंडिया टेक्निकल अँन्ड इकॉनॉमिक सर्विसेस लि. या संस्थेने फेब्रुवारी १९८१ मध्ये तयार केलेला तुर्भे येथील कृषि उत्पन्न बाजाराकरिता बांधावयाच्या नियोजित लोहमार्ग फाटयाच्या तांत्रिक आर्थिक व्यवहार्यता अहवालाचा संक्षेप व शिफारशी.

या विषयाची नोंद घेण्यात आली.

बाब क्र. १५ : पूर्व-पश्चिम लोहमार्गाच्या छन्नमार्गाचा अभ्यास. - एक कार्यकारी संक्षेप

या विषयाची नोंद घेण्यात आली.

बाब क्र. १६ : मुंबई महानगर परिवहन उपक्रमाबाबत अहवाल

या विषयाची नोंद घेण्यात आली.

बाब क्र. १७ : मुंबई महानगर प्रदेशातील पाण्याचा स्त्राव्य साठी आणि त्याचे वितरण यांचा अभ्यास-पुढील घटना

या विषयाची नोंद घेण्यात आली.

बाब क्र. १८ : कल्याण समूह अधिसूचित क्षेत्रासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती.

(१) आवश्यक कर्तव्ये पार पाडण्यासाठी कर्मचारी वर्गाची नियुक्ती.

(२) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर नियोजन अधिनियमाचे प्रकरण ४ संबंधातील अधिकार ठाण्याच्या जिल्हाधिकाऱ्यास व कल्याण, डोंबिवली, उल्हासनगर व अंबरनाथच्या नगरपालिका परिषदांना प्रदान करणे.

प्राधिकरणाने कार्यसूचीवरील बाबींचा विचार विनिमय करुन खालील ठराव संमत केला :-

ठराव क्र. १८९ : असा ठराव करण्यात येत आहे की सन १९६६च्या महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाचे कलम १५१ (३) अन्वये प्राधिकरण याव्दारा असा निदेश देत आहे की, उक्त अधिनियमाचे प्रकरण ४ अन्वये विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून प्राधिकरण वापरीत असलेले सर्व अधिकार, कल्याण, उल्हासनगर, डोंबिवली व अंबरनाथ या नगरपालिका परिषदा त्यांच्या हद्दीत येणाऱ्या क्षेत्रांबाबत वापरतील व ठाण्याचे जिल्हाधिकारी कल्याण समूह अधिसूचित क्षेत्राच्या अवशिष्ट क्षेत्राबाबत वापरतील.

पुढे असा ठराव करण्यात येत आहे की, विशेष नियोजन प्राधिकरणाव्दारा विकासाचे नियंत्रण व जमिनीचा वापर या संबंधात शासनाने केलेल्या आवर्ती अनावर्ती स्वरुपाच्या खर्चाची त्यात या कारणासाठी शासनाने नियुक्त करुन ठाण्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सुपूर्द केलेल्या अतिरिक्त कर्मचारी वर्गावरील खर्चाचा समावेश होतो) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

शासनाकडे प्रतिपूर्ती करील मात्र ही रक्कम, गृहनिर्माण, नागरी नूतनीकरण आणि परिसर विज्ञान मंडळ, या बाबतीत संपूर्ण विचार विनिमय करुन जी कमाल मर्यादा निश्चित करील त्याहून अधिक असता कामा नये. या कामासाठी आणखी किती कर्मचारी लागतील त्याबाबतही गृहनिर्माण, नागरी नूतनीकरण आणि परिसर विज्ञान मंडळाने सूचना करावी.

पुढे असा ठराव करण्यात येत आहे की या ठरावाच्या पहिल्या परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे, प्राधिकरणाने सुपूर्द केलेले अधिकार ठाण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांस वापरतां यावे म्हणून महानगर आयुक्त राज्य शासनाची अनुमती मिळवतील.

त्यानंतर अध्यक्षांचे आभार मानून सभा समाप्त झाली.

----x(XXXXXXXXXXXXXXXX)x----

एचू: १२५८१.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची
तेविसावी सभा.

दिनांक : २३ मार्च, १९८१.

उपस्थित सदस्य :

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.रामराव डब्ल्यू आदिक,<br>नगरविकास, बीएम्आर्डीए<br>आणि वित्त मंत्री. | अध्यक्ष. |
| २) | श्री.चंद्रकांत त्रिपाठी,<br>नगरविकास आणि बीएम्आर्डीए<br>राज्यमंत्री. | उपाध्यक्ष. |
| ३) | श्री.बी.एच्.शेटे,<br>मुंबईचे महापौर. | उपाध्यक्ष. |
| ४) | श्रीमती ताराबाई वर्तक,<br>अध्यक्षा, जिल्हा नियोजन आणि<br>विकास परिषद, ठाणे. | सदस्य. |
| ५) | श्री.एस्.एच्.भोईर,<br>अध्यक्ष, ठाणे जिल्हा परिषद. | सदस्य. |
| ६) | श्री.व्ही.जी.धारप,<br>अध्यक्ष, स्थायी समिती,<br>मुंबई महानगरपालिका. | सदस्य. |
| ७) | श्री.के.बी.ठाणेकर,<br>अध्यक्ष, सुधार समिती.<br>मुंबई महानगरपालिका. | सदस्य. |
| ८) | श्री.एकनाथ रामचंद्र कोपर्डे,<br>नगरसेवक,<br>मुंबई महानगरपालिका. | सदस्य. |
| ९) | श्री.बी.डी.झुटे,<br>नगरसेवक,<br>मुंबई महानगरपालिका. | सदस्य. |
| १०) | श्री.ए.डब्ल्यू.पाटील,<br>नगरसेवक,<br>मुंबई महानगर पालिका. | सदस्य. |
| ११) | श्री.सी.सी.भुजबळ,<br>नगरसेवक,<br>मुंबई महानगरपालिका. | सदस्य. |
| १२) | श्री.(डॉ.) ए.यु.मेमन,<br>नगरसेवक,<br>मुंबई महानगरपालिका. | सदस्य. |
| १३) | श्री.आर्.पी.लाड,<br>नगरसेवक, | सदस्य. |

| | | |
|---|---|---|
| १४) | श्री. पी. एच्. अडवाणी, अध्यक्ष, उल्हासनगर पालिका परिषद, जिल्हा-ठाणे. | सदस्य. |
| १५) | श्री. पी. जी. कोर्गावे, अध्यक्ष, उल्हासनगर पंचायत समिती. | सदस्य. |
| १६) | श्री. ए. एन्. ठाकूर, अध्यक्ष, उरण पंचायत समिती. | सदस्य. |
| १७) | श्री. युसूफ हाफिज, विधान सभा सदस्य. | सदस्य. |
| १८) | श्री. सी. डी. उमाचेन, विधान सभा सदस्य. | सदस्य, |
| १९) | श्री. जी. एस्. त्रिवेदी, विधान सभा सदस्य, | सदस्य, |
| २०) | श्री. वकार अहमद गुलाम महमंद मोमीन, विधान सभा सदस्य. | सदस्य |
| २१) | श्री. टी. ई. सुर्वे, विधान सभा सदस्य. | सदस्य. |
| २२) | श्री. राम मनोहर त्रिपाठी, विधान परिषद सदस्य. | सदस्य |
| २३) | श्री. बी. के. चौगुले, आयुक्त, मुंबई महानगरपालिका. | सदस्य, |
| २४) | श्री. बी. एन्. आडारकर, अध्यक्ष, दळणवळण आणि दळणवळण मंडळ. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण. | सदस्य. |
| २५) | श्री. डी. एम्. सुकथनकर, महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण. | सदस्य-सचिव |

<u>निमंत्रित</u> :

महाव्यवस्थापक,
सिडको, मुंबई.

-----

# MINUTES OF THE TWENTY-THIRD MEETING OF THE B.M.R.D.A.

Date : 23rd March, 1981.
Time : 10.30 A.M.
Place : Committee Room, 6th Floor, Mantralaya, Bombay-400 032.

A list of members present is enclosed.

In his opening remarks, the Chairman, welcomed the new members who had joined since the last preceeding (22nd) meeting of the Authority was held and also placed on record the valuable services and guidance rendered by the members who had, since then, ceased to be the members of the Authority. The Chairman also referred to the following significant developments in regard to some of the important policies and development schemes of the Authority :

i) The shifting of the Wholesale Market of Onion and Potatoes to Turbhe after the dismissal, by the Supreme Court, of the appeal filed by the onion and potato merchants challenging the shifting;

ii) Constitution of a Group to prepare a Detailed Project Report (DPR) for the proposed Truck Terminal at Wadala Anik and steps being taken to guard from unauthorised encroachments the land earmarked for this important project;

iii) Finalisation of the DPRs and the report embodying social cost-benefit analysis of the proposed East-West Railway Corridor Project (Bandra-Kurla-Mankhurd-Vashi-Belapur-Panvel) and the efforts being made by the CIDCO, BMRDA and the State Government at the highest level to persuade the Government of India to sanction and implement this Project at the earliest;

iv) Constitution of a Committee for preparation of the Detailed Project Report in respect of the Inland Water Transport Project;

v) Completion of Techno-Economic Study of the proposed Railway Goods Line (Siding) Project from Kalwa to Turbhe and the steps being taken to implement this project expeditiously to facilitate early shifting of Wholesale Markets of the remaining agricultural commodities to Turbhe;

-vi)....2...

vi) Finalisation of its report by the Nhava-Sheva Infrastructure Study Group as a prelude to the development of a major port at Nhava-Sheva by the Government of India;

vii) Inaguration of the Rs.86 crore World Bank assisted Water Supply and Sewerage Project covering 6 municipal council areas and 104 villages in Thane District; and

viii) The orders issued recently by the Irrigation Department of the State Government reserving the waters of rivers in respect of 9 storage sites in the Bombay Hydrometric Area for exclusively meeting the requirements of the Bombay Metropolitan Region.

The Chairman also mentioned that the State Govt. had constituted a High Power Steering Group to consider the problem of slums in Greater Bombay and of dilapidated buildings in the Bombay Island and to make concrete recommendations calculated to solve the problem.

2. Adverting to the reference made by the Chairman to the constitution by the State Govt. of the High Power Steering Group on slums and dilapidated buildings in Bombay, several members expressed their dissatisfaction and concern about, what in their view, was a unilateral decision taken by the Govt. to set up the said Steering Group by bypassing the BMRDA which was the main planning authority for the Bombay Metropolitan Region and which was vitally concerned with the matters referred to the Steering Group, including the question of relaxation of F.S.I. The members expressed their apprehension that any relaxation in the FSI would result only in a further intolerable strain on the civic services and

amenities and the transport infrastructure, leading to a virtual break down. The Chairman clarified that it was never the intention of Government to bypass the BMRDA or to generally relax the existing restrictions on FSI in Greater Bombay. The intention of Government in constituting the High Power Steering Group was to have the problem of slums in Greater Bombay and of dilapidated buildings in Bombay Island, with which a number of agencies, including the BMRDA, were concerned, throughly studied and analysed by a Group of independent and knowledgeable persons. The Group, after holding discussions and consultations with all interested individuals and official and non-official bodies concerned, is expected to formulate effective and workable proposals calculated to solve the problem. After considerable discussion, it was decided that a special meeting of the Authority may be held as early as possible to finalise its views on the matters which had been entrusted to this High Power Steering Group so that these views could be communicated to the Steering Group for its consideration before the Group finalises its proposals/recommendations.

<u>Item Nos.1 and 2</u> : <u>Confirmation of the minutes of the last (22nd) meeting and the action taken thereon.</u>

After discussion in the course of which certain observations and points noted below were made by certain members, the minutes were confirmed and the action taken was noted.

(i) While noting the progress of work done by the Study Group constituted by the Authority to study the problems of fishermen in Bombay, it was pointed out that the fishermen continued to face the problem of space for carrying on their operations like drying their nets, fish, etc. The Report of the Kher Committee appointed in the past on this subject should

be...4...

be looked into. Unauthorised reclamation of further land at Malavani, where there is a sizable concentration of fishermen, should be stopped with a view to obviating the further aggravation of the problems of fishermen living there.

(ii) The need for fixing a proper location (preferably at Dadar) for a wholesale flower market and providing sufficient space for the operation of this market should not be lost sight of when considering the general question of the shifting of wholesale markets from South Bombay. Incidentally, it was pointed out that a mention regarding the proposal relating to the flower market, which had been made in the English version of the minutes, had remained to be made in the Marathi version and this inadvertent ommission should be removed.

(iii) While noting the comments of the Directorate of Health Services in regard to the alleged danger to public health owing to concentration of leprosy patients in an area to the north-east of Bassein near Valiv Gokhivre, the members were not satisfied with the observation of the Directorate that there is no relation whatsoever between leprosy and water sources and hence there is no scientific basis that leprosy patients cause public health hazard to the general public. It was agreed that this matter should be got re-examined and an authentic and reliable scientific opinion should be obtained on the pollution hazard, if any, posed by the clustering of leprosy-affected persons near Valiv-Gokhivre.

How...5...

How and when the colony of leprosy patients had come near the Valiv Gokhivre should also be ascertained.

(iv) As regards the unauthorised conversion of premises in Greater Bombay for commercial use, the members were informed that the Executive Committee had constituted a Committee under the Chairmanship of the Secretary to Govt., Urban Development and Public Health Department, to consider the question of control on unauthorised change of user of premises in Greater Bombay. The Committee had already met once and made certain interim recommendations.

(v) The members expressed their concern about the delay in the construction of the railway over-bridge at Kurla and of the approach roads thereto in particular and it was stressed that all steps should be taken to expedite completion of this work.

(vi) As decided earlier, a visit of the members of the Authority to Nhava Sheva site and the Truck-Terminal Project should be arranged at an early convenient date.

Item No.3 : Amendment to Regulations 7 and 9 of the Bombay Metropolitan Region Development Authority (Disposal of Land) Regulations, 1977.

The Authority considered the Agenda Item, and passed the following Resolution :

RESOLUTION NO.181 :

Resolved that the amendments to Regulations No.7 and 9 of the BMRDA (Disposal of Land) Regulations, 1977, as recommended by the Standing Committee by its Resolution No.158 dated 7.3.1981, be and are hereby approved.

Resolved further that the above amended regulations shall be deemed to have been made by the Authority under Section 50 of the BMRDA Act, 1974.

Item No.4...6..

Item No.4 : Government of Maharashtra's request to BMRDA to construct suitable building/buildings on 2 plots in "E" Block of the Bandra-Kurla Complex - and Amendment to Regulation 9 of the BMRDA (Disposal of Land) Regulations, 1977.

The Authority considered the Agenda Item, and passed the following Resolution :

RESOLUTION NO. 182 :

Resolved that the amendment to Regulation 9 of the BMRDA (Disposal of Land) Regulations, 1977, as recommended by the Standing Committee under its Resolution No.157 dated 7.3.1981, be and is hereby approved.

Resolved further that the above amended regulation shall be deemed to have been made by the Authority under Section 50 of the BMRDA Act, 1974.

Resolved further that the proposal regarding construction of Government buildings from the BMRDA's funds, which the Standing Committee had, by its Resolution No.156, dated the 7th March, 1981, resolved to accept in anticipation of the Authority's approval, be and is hereby approved.

Item No.5 : Minor Modification to the Final Planning Proposals of the Bandra-Kurla Notified Area.

After some discussion, it was decided that a meeting of the representatives of the BMRDA, the Central Railway, and the Bombay Municipal Corporation should be held to consider the matter in further detail. The item was, therefore, deferred.

Item No.6 : Annual Works Programme for 1981-82.

During the course of the discussion on the Annual Works Programme for 1981-82, the

members participating in the discussion made the following points :-

(i) In the Annual Works Programme for 1981-82, there is an item of work of construction of vegetable and yarn market at Bhiwandi by the Bhiwandi Municipal Council. The possibility of expanding the scope of this market to provide for facilities therein for the marketing of cloth also should be explored.

(ii) Some members referred to the need for revision of the Regional Plan for the Bombay Metropolitan Region, which had been sanctioned in 1973, in the light of the subsequent developments, and enquired as to what action was being taken in that behalf. It was clarified that the decennial revision of the Regional Plan for the BMR is the statutory responsibility of the BMRDA and that under the Annual Works Programme for 1981-82, a provision had already been proposed for initiating preliminary work in connection with the revision of the Regional Plan which was due in 1983.

(iii) Some members referred to the air pollution being caused by some of the chemical units like Herdillia and Rallis in the Thane-Belapur belt of New Bombay. It was explained that effective steps against industrial units causing air pollution would be feasible only after the Central legislation for prevention and control of air pollution, which was already on the anvil, is enacted and brought into force. It was also explained that a provision had been made in the Annual Works Programme for 1981-82 for conducting air quality surveys in the area of the BMR (excluding the area of the Bombay Municipal Corporation and the New Bombay) by setting up 13 air quality monitoring stations under the aegis of the Maharashtra Prevention of Water Pollution Board.

(iv) Some members enquired whether the report of M/s. Kirloskar Consultants Limited, who had been entrusted with the task of preparing a Feasibility Report for the Water Supply and Sewerage Project for the areas of 6 municipal councils and 104 villages in Thane District, had submitted their Report. It was explained that the Report of these Consultants had already been received. The Consultants had also submitted another Report in respect of a supplementary task entrusted to them, namely that of assessment and development of water resources in the Bombay Hydrometric Area. This latter Report is now being updated and a provision had already been proposed in the Annual Works Programme for 1981-82 for undertaking the study for updating the water resources data in the Bombay Hydrometric Area.

(v) Shri Momin, M.L.A. from Thane District, enquired as to why the Lakhivli Project for water supply to Bhiwandi Town had not been implemented. In this connection, it was clarified that the 86 crore World Bank assisted Water Supply and Sewerage Project for 6 Municipal Towns and the 104 villages in Thane District covers Bhiwandi Municipal Town also and, therefore, the Lakhivli Project, which had been earlier conceived for meeting primarily the water supply requirements of Bhiwandi Town had become superfluous and was not being pursued.

(vi) Shri Dharap desired to know the progress of work on the Middle Vaitarana Project.

He also wanted information on certain other works and schemes. The Chairman directed that the information desired by Shri Dharap may be supplied to him separately.

The Authority then approved the Annual Works Programme for 1981-82, and passed the following Resolution :-

RESOLUTION NO.183 :

RESOLVED THAT (a) the Annual Works Programme for the year 1981-82 presented with the Agenda Note be and is hereby approved and (b) the Standing Committee is hereby authorised to accord approval to the details of the schemes included in the Annual Works Programme.

Item No.7 : A schematic analysis of the on-going Programme and the proposed programmes as embodied in the Annual Works Programme for 1980-81 submitted to and approved by the Authority at its meeting held on 28.7.1980. (Deferred Item No. 9 of last meeting)

The Authority considered the Agenda Item and noted the progress of the Schemes.

Item No.8 : Annual Budget Estimates for 1981-82.

The Authority considered the Agenda Item, and passed the following Resolution :-

RESOLUTION NO.184 :

Resolved that the Annual Budget Estimates in respect of the financial year 1981-82 and the Revised Estimates for 1980-81 showing estimated receipts and disbursements of the Metropolitan Authority, be and are hereby approved under Section 23(1) of the BMRDA Act, 1974.

Resolved further that the Authority do hereby delegate the power to the Standing Committee to sanction schemes, surveys, etc. not included in the works programme and estimated to cost not more than Rs.10 lakhs in each case and to authorise the incurring of any expenditure not

exceeding the same limit, in respect of which provision has not been made in the approved budget, subject to a report of such cases being made to the Authority at the next meeting.

Resolved further that the respective Functional Boards be and are hereby authorised to sanction the details of the schemes involving studies, surveys and investigations for which provision has been made in the budget.

Resolved further that the authorities competent to sanction the creation of posts be and are hereby authorised to create posts which are not included in establishment schedule to the budget, provided that the expenditure on such posts can be met from the total provision for salaries and allowances to the staff made in the budget.

Item No.9 : Annual Report of the BMRDA for 1979-80.

The following points were raised during the course of the discussion on this item :

(i) It was stated that the work of village improvement in Ambapada village, estimated to cost Rs.2.35 lakhs and carried out by the Bombay Municipal Corporation, leaves much to be desired. The Member was told that the exact position will be ascertained from the Bombay Municipal Corporation and the same would be reported in due course.

(ii) The villages through which the water supply mains of the B.M.C. carrying water to Bombay City do not get the benefit of water

supply...11...

supply. The Municipal Commissioner said that the Corporation is primarily responsible for ensuring water supply to Bombay City. The possibility of supplying water to the villages en route will, however, be examined by the B.M.C.

The Authority then passed the following Resolution :-

RESOLUTION NO.185 :

Resolved that the draft of the Annual Report of the BMRDA for 1979-80 be and is hereby approved and the Metropolitan Commissioner is authorised to submit the same to the State Government.

Item No.10: Election to the Standing Committee.

The Item was deferred.

Item No.11 : Annual Report of the Bombay Metropolitan Region Development Authority as a Special Planning Authority for Kalyan Complex Notified Area 1976-1980.

The Authority considered the Agenda Item, and passed the following Resolution :

RESOLUTION NO.186 :

Resolved that the draft of the Annual Reports for the period 1976-80 of the B.M.R.D.A. as the Special Planning Authority for Kalyan Complex Notified Area be and are hereby approved and the Metropolitan Commissioner is authorised to submit the same to the State Government.

Item No.12 : Annual Report by the BMRDA as a Special Planning Authority for Bandra-Kurla Notified Area for the year 1979-80.

The Authority, after considering the Item, passed the following Resolution :

RESOLUTION NO.187 :

Resolved that the draft of the Annual Report for the year 1979-80 of the BMRDA as the Special Planning Authority for Bandra-Kurla Notified Area be and is hereby

approved...12...

63

approved and the Metropolitan Commissioner is authorised to submit the same to the State Government.

Item No.13 : Kalwa-Turbhe Goods Siding - Construction.

The Authority, after considering the item, passed the following Resolution :

RESOLUTION NO.188 :

Resolved that the Authority approves the payment of Rs.2 crores as grant-in-aid to the CIDCO from the funds to be provided by the DPDCs over a period of two to three years from 1981-82 to 1983-84 for the construction of Kalwa-Turbhe Goods Siding required for agriculture produce wholesale markets at Turbhe in New Bombay.

Resolved further that a sum of Rs.2 crores be given to the City and Industrial Development Corporation as a 'bridging loan', in suitable instalment spread over the aforesaid period (1981-82 to 1983-84), for construction of Kalwa-Turbhe Siding and the Standing Committee be and is hereby authorised to decide the rate of interest to be charged on this loan after taking into account the precedents and other cognate factors.

Resolved also that the anticipatory action of the Chairman, BMRDA in approving the above proposal in anticipation of the approval of the Authority be and is hereby ratified and that the Metropolitan Commissioner be and is hereby authorised to take all necessary actions to ensure the expeditious implementation of

the...13...

the Kalwa Turbhe Goods Siding.

Item No.14 : Summary and Recommendations of Techno-Economic Feasibility Report of the proposed Railway Siding for Agricultural Produce Market at Turbhe prepared by the Rail India Technical and Economic Services Limited (RITES), February, 1981.

This was noted.

Item No.15 : East-West suburban Railway Corridor Study - an executive summary.

This was noted.

Item No.16 : Status Report on Bombay Metropolitan Transport Undertaking.

This was noted.

Item No.17 : Study of Water Potential and its allocation in Bombay Metropolitan Region - Further Development.

This was noted.

Item No.18 : Appointment of BMRDA as a Special Planning Authority for Kalyan Complex Notified Area -

(i) Creation of staff for dealing with the obligatory duties and

(ii) Delegation of powers pertaining to Chapter IV of M.R. & T.P. Act, to the Collector of Thane and Municipal Councils of Kalyan, Dombivali, Ulhasnagar and Ambernath.

The Authority considered the Agenda Item and passed the following Resolution :

RESOLUTION NO.189 :

Resolved that the Authority hereby directs under Section 151(3) of the M.R.T.P. Act, 1966 that all powers exerciseable by it as Special Planning Authority under Chapter IV of the said Act shall be exercised by the Municipal Councils of Kalyan, Ulhasnagar, Dombivli and Ambernath in respect of the areas within their respective municipal limits and by the Collector of Thana in respect of the remaining area of the Kalyan Complex notified area.

Resolved...14...

Resolved further that the Bombay Metropolitan Region Development Authority shall reimburse to Government the expenditure of a recurring and non-recurring nature (including the expenditure on additional staff that is created by Government and attached to the Collectorate of Thane for this purpose) incurred by Government in connection with the control of development and use of land on behalf of the Special Planning Authority, but not exceeding the ceiling that the Housing, Urban Renewal and Ecology Board may, on full consideration of the matter, lay down in this behalf; the Housing, Urban Renewal and Ecology Board should also suggest to Government the additional staff that may be created for this purpose.

Resolved also that the Metropolitan Commissioner shall obtain the consent of the State Government to the Collector of Thane exercising the delegated power of the Authority as referred to in the first paragraph of this Resolution.

The meeting then terminated with a vote of thanks to the Chair.

----------

67

Twenty-Third Meeting of the B.M.R.D.A.

Date : 23rd March, 1981.

MEMBERS PRESENT :

| | | |
|---|---|---|
| 1. | Shri Ramrao W. Adik, Minister for Urban Development & BMRDA. | Chairman |
| 2. | Shri Chandrakant Tripathi, Minister for State(BMRDA). | Vice-Chairman |
| 3. | Shri B.H. Shete, Mayor of Bombay | Vice-Chairman |
| 4. | Smt. Tarabai Vartak, Chairman, DPDC, Thane. | Member |
| 5. | Shri S.H. Bhoir, President, Zilla Parishad, Thane. | Member |
| 6. | Shri V.G. Dharap, Chairman, Standing Committee, B.M.C. | Member |
| 7. | Shri K.B. Thanekar, Chairman, Improvements Committee, B.M.C. | Member |
| 8. | Shri E.R. Koparde, Councillor, BMC. | Member |
| 9. | Shri B.D. Zute, Councillor, BMC | Member |
| 10. | Shri A.W. Patil, Councillor, BMC | Member |
| 11. | Shri C.C. Bhujbal, Councillor, BMC | Member. |
| 12. | Shri (Dr.) A.U. Memon, Councillor, BMC | Member |
| 13. | Shri R.P. Laud, Councillor, BMC | Member |
| 14. | Shri P.H. Advani, President, Ulhasnagar, Municipal Council | Member |
| 15. | Shri P.G. Koshimbe, Chairman, Ulhasnagar Panchayat Samiti | Member |
| 16. | Shri A.N. Thakur, Chairman, Uran Panchayat Samiti | Member |
| 17. | Shri Yusuf Haffiz MLA | Member |

2/-.....

18. Shri C.D. Oomachan, MLA. Member.

19. Shri G.S. Trivedi, MLA. Member.

20. Shri Vakar Ahmed Gulam Mahmed Mohin, MLA. Member.

21. Shri T. E. Surve, MLA. Member.

22. Shri Ram Manohar Tripathi, MLC. Member.

23. Shri B.K. Chougule, Municipal Commissioner, BMC. Member.

24. Shri B.N. Adarkar, Chairman, T & C Board, BMRDA. Member.

INVITEES :

The Managing Director,
CIDCO, Bombay.

---------------